क्र.कामगार/ब/४/ककनिस/ ४१५७
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
प्रकाशगड, प्लॉट नं. जी-९, बांद्रा (पूर्व),
मुंबई-४०० ०५१.

दि.:- २३-९-१९९६

: परिपत्रक :

विषय:- कर्मचारी कल्याण निधी समितीच्या
बैठकीत घेण्यात आलेले निर्णय.

.....

कर्मचारी कल्याण निधी समितीची २७वी बैठक दिनांक १३.९.९५, रोजी प्रकाशगड, बांद्रे येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१) सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात शिक्षण घेउन मार्च १९९४ व त्यानंतर माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण होणा-या वेतनगट १ व २ मधील अधिका-यांच्या, रोख पारितोषिके मिळविण्या-या पाल्यांना, सन १९९४-९५ या वर्षापासून दरमहा रु. ७५/- या दराने शिष्यवृत्ती देण्यात यावी.

२) मंडळाच्या अधिकारी व कर्मचा-यांच्या पाल्यांना मंजूर केलेली शिष्यवृत्ती फक्त पदविका व पदवीप्राप्त शिक्षण पूर्ण होईपर्यंत चालू ठेवण्यात यावी.

३) मार्च १९९५ व त्यानंतर माध्यमिक शालांत परिक्षेत उत्तीर्ण होणा-या वेतनगट १ ते ४ मधील अधिकारी/कर्मचा-यांच्या अंध पाल्यांसाठी रु. २५०/- चे प्रथम क्रमांकाचे एक राखीव पारितोषिक देण्यात यावे.

४) कर्मचारी कल्याण निधीतून परिपत्रक क्र. कामगार/ब/ककनिस/१४९९ दिनांक १२.१.८३ नुसार राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा तसेच आंतरराज्य विद्युत मंडळ क्रीडा स्पर्धेमध्ये भाग घेउन प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक (सुवर्णपदक, रौप्यपदक व कास्यपदक) मिळविणा-या अधिकारी/कर्मचा-यांना जी रोख पारितोषिके, (वैयक्तिक व सांघिक स्पर्धेसाठी) देण्यात येतात त्या रकमेत खालीलप्रमाणे वाढ करण्यात आलेली आहे. हा निर्णय सन १९९५-९६ या वर्षापासून अंमलात येईल.

| | | |
|---|---|---|
| १) वैयक्तिक स्पर्धा - | १) प्रथम क्रमांक (सुवर्णपदक) | - रु. १०००/- |
| | २) द्वितिय क्रमांक (रौप्यपदक) | - रु. ६००/- |
| | ३) तृतीय क्रमांक (कास्य पदक) | - रु. ४००/- |
| २) सांघिक स्पर्धा - | १) प्रथम क्रमांक (सुवर्णपदक) | - रु. ३००/- |
| | २) द्वितीय क्रमांक (रौप्यपदक) | - रु. २५०/- |
| | ३) तृतीय क्रमांक (कास्यपदक) | - रु. २००/- |

५) राज्य पातळीवर कोणत्याही सेवात विशेष प्राविण्य प्राप्त केल्यामुळे दिले जाणारे पुरस्कार मंडळाच्या सेवेत असताना प्राप्त करणाऱ्या मंडळाच्या अधिकारी/कर्मचारी यांना रु.१५०१/- चे विशेष पारितोषिक देण्यात यावे. तसेच राष्ट्रीय पातळीवर दिले जाणारे पुरस्कार मंडळाच्या सेवेत असताना मंडळाच्या अधिकारी/कर्मचारी यांनी प्राप्त केले तर त्यांना रु.२५०१/- चे विशेष पारितोषिक देण्यात यावे.

६) मंडळाच्या सेवेत असताना "गुणवंत कामगार पुरस्कार" प्राप्त करणाऱ्या मंडळाच्या कर्मचाऱ्यांना रु.५०१/- चे विशेष पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात यावे. हे विशेष पारितोषिक व प्रमाणपत्र संबंधित कर्मचाऱ्यांना त्या त्या परिमंडळात किंवा कार्यालयात समारंभपूर्वक देण्यात यावे.

७.अ) आंतरपरिमंडलीय नाट्यस्पर्धेत प्रथम आलेल्या नाटकास राज्यनाट्यस्पर्धेत भाग घेण्यासाठी रु.४०००/- अनुदान देण्यात येते. त्याचधर्तीवर सदर नाटकास कामगार कल्याण केंद्र नाट्यस्पर्धेत भाग घेण्यासाठी रु.४०००/-(रु.चार हजार फक्त) अनुदान, कर्मचारी कल्याण निधीतून देण्यात यावे. हा निर्णय सन १९९४-९५ या वर्षापासून अंमलात येईल.

ब) प्रत्येक परिमंडळातील आंतरप्रविभागीय नाट्यस्पर्धेत प्रथम आलेल्या नाटकास राज्यनाट्यस्पर्धा/कामगार कल्याण केंद्र नाट्यस्पर्धेत भाग घेण्यासाठी रु.४०००/- (रु.चार हजार फक्त) अनुदान, कर्मचारी कल्याण निधीतून देण्यात यावे. हा निर्णय सन १९९४-९५ या वर्षापासून अंमलात येईल.

क) प्रत्येक परिमंडळातील आंतरप्रविभागीय नाट्यस्पर्धेत मंडळाच्या कर्मचाऱ्यांनी नाटक सादर केले व त्यास प्रथम पारितोषिक मिळाले नाही. परंतु अशा नाट्यचमुनी स्वत: खर्च करून त्यांचे नाटक मंडळाच्या वतीने राज्यनाट्यस्पर्धा किंवा कामगार कल्याण केंद्र नाट्यस्पर्धेत सादर केले व ते बक्षिसपात्र ठरून नाट्यस्पर्धेच्या अंतिम फेरीत नाटक सादर करण्यासाठी निवड झाली तर अशा नाट्यचमुस अंतिम नाट्यस्पर्धेत नाटक सादर करण्यासाठी रु.४०००/-(रु.चार हजार फक्त) अनुदान कर्मचारी कल्याण निधीतून देण्यात यावे. हा निर्णय सन १९९४-९५ या वर्षापासून अंमलात येईल.

ड) राज्यनाट्यस्पर्धेत किंवा कामगार कल्याण केंद्र नाट्यस्पर्धेच्या प्रथम फेरीत तसेच अंतिम फेरीत मंडळाच्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या नाटकास बक्षिस मिळाले तर राज्यशासनाकडून किंवा कामगार कल्याण केंद्राकडून त्यांना जितक्या रकमेचे बक्षिस मिळेल तितक्याच रकमेचे बक्षिस कर्मचारी कल्याण निधीतून देण्यात यावे. तसेच वैयक्तिक बक्षिस प्राप्त कर्मचाऱ्यांस (उदा. अभिनय, दिग्दर्शन, संगीत, नेपथ्य, प्रकाशयोजना इत्यादी) तेवढ्याच रकमेचे बक्षिस कर्मचारी कल्याण निधीतून देण्यात यावे. हा निर्णय सन १९९४-९५ या वर्षापासून अंमलात येईल.

सचिव
कर्मचारी कल्याण निधी समिती
व
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

प्रति, प्रेषण यादीनुसार सर्वांना.